Ioआ(?)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** म्हसवड
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0282 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 02/09/2023 01:48

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 01/09/2023
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 01/09/2023
**Time From (वेळेपासून):** 15:45 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:35 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 02/09/2023 **Time (वेळ):** 01:47 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 004
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/09/2023 01:48 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** म्हसवड,माण

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सौ.कविता संतोष कदम

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1995

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | परांडा,परांडा,परांडा,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शेणवडी,माण,म्हसवड ,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | तुकाराम शामराव नरळे | | | 1. पानवण,माण,म्हसवड ,सातारा, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
खबर दिनांक 02/09/2023

मी, सौ.कविता संतोष कदम, वय 28 वर्षे, मुळ रा. शेणवडी ता.माण जि.सातारा सध्या रा. शिक्षक सोसायटी, स्वामी विवेकानंद नगर, कुर्डेवाडी रोड,परांडा जि.धाराशिव मो.नं.8983110089, 9763733873 अशी असुन मी दि.01/09/2023 रोजी समक्ष ऍन्टी करप्शन ब्युरो, सातारा येथे हजर राहून पोलीस उप अधीक्षक श्रीमती वैद्य मॅडम यांना प्रत्यक्ष भेटून माझ्याकडे करण्यात येणाऱ्या लाचेच्या मागणी बाबत तक्रार थोडक्यात सांगितली व मी माझी तक्रार स्वहस्ताक्षरात लिहून वैद्य मॅडम यांना दिली व माझ्या तक्रारी नुसार कारवाई करावी अशी विनंती केली. त्यानुसार वैद्य मॅडम यांनी दोन सरकारी पंचांना व मला एकमेकांशी ओळख करुन दिली. त्यावेळेस मी पंचांना माझी तक्रार थोडक्यात सांगितली ती अशी की, माझे चुलत सासरे तुकाराम बंडू कदम यांचे नावची मौजे शेणवडी येथील गट क्र.706,721,722,723,724,727,620,621,624,623,713 व 700 या सर्व गटामधील मिळून साडे तेरा एकर जमीन म्हसवड येथील दिवाणी न्यायालय दावा क्रं.234/2023 मध्ये दिनांक 20/07/2023 रोजी मा.न्यायालयाच्या आदेशानुसार हुकूमनामा करण्यात आला असून माझे चुलत सासरे तुकाराम कदम यांची वर नमूद गटातील साडे तेरा एकर जमीन माझे पती संतोष गोविंद कदम व माझे दीर पोपट गोविंद कदम यांचे नावे करण्याबाबत मा.न्यायालयाने आदेश दिला आहे.
त्यानुसार मागील आठ दिवसापूर्वी मा.न्यायालयाच्या आदेशानुसार हुकूमनाम्याप्रमाणे जमीनीचा फेरफार नोंद होण्यासाठी आम्ही मौजे शेणवडीचे तलाठी नरळे यांना मा.न्यायालयाच्या हुकूमनाम्याची झेरॉक्स प्रत देवून फेरफार नोंद करण्यास सांगितले होते. त्यानंतर दिनांक 31/08/2023 रोजी तलाठी नरळे यांना म्हसवड येथे प्रत्यक्ष भेटून आमचे फेरफार नोंदणीचे काम कुठ पर्यंत आले आहे याची चौकशी केली तेव्हा तलाठी नरळे यांनी हुकूमनाम्याप्रमाणे फेरफार नोंद करण्यासाठी 16,000/- रुपये लागतील असे सांगितले. तेव्हा मी माझ्या पतीने आम्ही एवढे पैसे देवू शकत नाही असे सांगितल्यावर तलाठी नरळे यांनी फेरफार नोंदणीसाठी कमीत कमी 11,000/- रुपये तरी दयावे लागतील असे सांगितले. त्यावर मी नरळे यांना या 11,000/- रुपयाची पावती देणार का असे विचारले असता नरळे यांनी या पैशांची पावती मिळत नसते असे सांगितले. यावरुन नरळे हे आमच्याकडे 11,000/- रुपये लाच मागत आहेत अशी आमची खात्री झाली. परंतू आम्हाला नरळे तलाठी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा यांचेकडे लेखी तक्रार दिली. माझी लेखी तक्रार पंचांनी वाचून बघितली व त्यावर सहया केल्या.
त्यानंतर मी, पंच व सापळा पथक असे सर्वजण लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, सातारा येथून शासकीय वाहनाने अंदाजे 13.00 वा.निघून म्हसवड बाजार पर्किंग येथे आलो. त्यानंतर वैद्य मॅडम यांचे सुचनेनुसार मी माझा मोबाईल क्रंमाक 8983110089 तलाठी नरळे यांना त्यांचे मोबाईल क्र.9404794375 वर स्पिकर ऑन करुन फोन केला व मी म्हसवड मध्ये आले असल्याचे सांगितले. त्यावर तलाठी नरळे यांनी मला जांभूळणी येथे भेटायला येण्यास सांगितले. परंतु वैद्य मॅडम यांचे सुचनेनुसार मी पुन्हा तलाठी नरळे यांना फोन करुन म्हसवड येथेच भेटायला या असे सांगितले. त्यानुसार तलाठी नरळे यांनी मला म्हसवड येथील स्मशनभूमी जवळ येण्यास सांगितले. वैद्य मॅडम यांचे सुचनेनुसार मी नरळे तलाठी यांना केलेले फोन कॉल रेकॉर्ड करण्यात आले आहेत. त्यानंतर वैद्य मॅडम यांनी मला व पंचांना पडताळणीच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना देवून मला व पंच नं.1 गायकवाड यांना माझ्या दुचाकी वरुन नरळे, तलाठी यांची भेट घेवून लाचेच्या मागणी संदर्भात चर्चा करण्यासाठी अंदाजे 15.45 वा.चे सुमारास पाठविले. त्यावेळी नरळे, तलाठी यांनी सुरुवातीला पेनाने कागदावर लिहून 11,000/- रुपये इतकी लाचेची मागणी केली. परंतू इतकी रक्कम देणे शक्य नसल्याने काही तरी कमी करा असा मी माझ्या पतीने आग्रह केल्याने नरळे, तलाठी यांनी तडजोडी अंती 9,000/- रुपये इतक्या लाचेच्या रक्कमेची मागणी केली व रक्कम लागलीच पाहिजे असल्याची जाणीव करुन दिली. त्यावर माझे पती नरळे, तलाठी यांना रक्कम आता आणली नाही

लगेच घेवून येतो थांबा असे म्हणाले असता ते तेथून निघून गेले. म्हणून मी व पंच नं.1 असे शासकीय वाहनाजवळ परत आलो व वैद्य मॅडम यांना घडलेली हकीकत सांगितली.

त्यानंतर वैद्य मॅडम यांनी पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डरवरील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले व पंचांची आणि वैद्य मॅडम यांची नरळे, तलाठी यांनी माझ्याकडे 9,000/- रुपये लाचेची मागणी केल्याची खात्री पटल्याने व जास्त वेळ मध्ये गेला तर संशय येवून नरळे, तलाठी हे लाचेची रक्कम स्विकारणार नाहीत याची खात्री झाल्याने वैद्य मॅडम यांनी पडताळणी दरम्यानचे व्हॉईस रेकॉर्डरवरील ध्वनीमुद्रीत झालेल्या संभाषणाची स्क्रिप्ट नंतर बनविण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर वैद्य मॅडम यांनी मला व पंचांना सापळापूर्व पंचानाम्याची थोडक्यात माहिती सांगून सापळयाच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना देवून सापळा रक्कम देण्यासाठी रवाना करण्याचा निर्णय घेतला. त्याआधी नरळे, तलाठी हे कोठे आहेत याची माहिती घेण्यासाठी वैद्य मॅडम यांच्या सुचनेनुसार मी स्पिकर ऑन करुन नरळे, तलाठी यांना फोन केला व लाचेची रक्कम घेवून कोठे येवू असे नरळे, तलाठी यांना विचारले तेव्हा नरळे, तलाठी यांनी मला लाचेची रक्कम घेवून म्हसवड येथील ढोर कारखान्याजवळ येण्यास सांगितले. त्यानुसार मी पंच नं.1 असे लाचेची रक्कम घेवून ढोर कारखान्याजवळ गेलो असता नरळे, तलाठी हे तेथे माझी वाट बघत त्यांचे चारचाकी गाडीमध्ये थांबून होते. तेव्हा मी 9,000/- रुपये इतकी लाचेची रक्कम माझ्या उजव्या हाताने माझ्या हातातील पर्स मधून काढून नरळे, तलाठी यांचेसमोर धरली असता नरळे, तलाठी यांनी त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन त्यांच्या पॅन्टचे समोरील उजव्या खिशात ठेवली. त्यावेळी मी माझ्या डाव्या हाताने माझ्या साडीच्या पदराने तोंड पुसून सापळा पथकाला पूर्वनियोजित इशारा केला. तेव्हा लागलीच वैद्य मॅडम सह सापळा पथकाने पंचासमक्ष नरळे, तलाठी यांना लाचेच्या रक्कमेसहीत रंगेहात पकडले. तेव्हा मला नरळे तलाठी, यांचे पुर्ण नाव तुकाराम शामराव नरळे, वय 36 वर्षे, तलाठी, सजा-वडजल अतिरिक्त सजा-शेणवडी ता.माण जि.सातारा रा.पानवण ता.माण जि.सातारा असे असल्याचे समजले. त्यानंतर वैद्य मॅडम यांचे सुचनेनुसार सापळा पंचनाम्याची पुढील कारवाई व्ही के रिसॉर्ट ॲण्ड लॉजींग, म्हसवड रुम नं.1 येथे करण्यात आली.

अशारितीने नरळे, तलाठी यांनी माझे चुलत सासरे तुकाराम बंडू कदम यांचे नावची मौजे शेणवडी येथील गट क्रं. 706,721,722,723,724,727,620,621,624,623,713 व 700 या सर्व गटामधील मिळून साडे तेरा एकर जमीन म्हसवड येथील दिवाणी न्यायालय दावा क्रं.234/2023 मध्ये दिनांक 20/07/2023 रोजी मा. न्यायालयाच्या आदेशानुसार हुकूमनामा करण्यात आला असून माझे चुलत सासरे तुकाराम कदम यांची वर नमूद गटातील साडे तेरा एकर जमीन माझे पती संतोष गोविंद कदम व माझे दीर पोपट गोविंद कदम यांचे नावे करण्याबाबत मा.न्यायालयाने आदेश दिला आहे. सदर हुकूमनाम्याच्या आदेशानुसार फेरफार नोंद करण्यासाठी तुकाराम शामराव नरळे, वय 36 वर्षे, तलाठी, सजा-वडजल अतिरिक्त सजा-शेणवडी ता.माण जि.सातारा रा.पानवण ता.माण जि. सातारा यांनी दिनांक 01/09/2023 रोजी स्मशानभुमी म्हसवड व ढोर कारखान्यासमोर रस्त्यावर माझ्याकडे बेकायदेशीररित्या सुरुवातीला 11,000/- रुपये व तडजोडीअंती 9,000/- रुपये इतकी लाचेच्या रक्कमेची मागणी करुन ती लाच रक्कम माझ्याकडून दिनांक 01/09/2023 रोजी 15:45 ते 16:35 वा.चे दरम्यान स्विकारल्याने माझी तुकाराम शामराव नरळे, वय 36 वर्षे, तलाठी, सजा-वडजल अतिरिक्त सजा-शेणवडी ता.माण जि.सातारा रा.पानवण ता.माण जि.सातारा यांचेविरुध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझे नरळे, तलाठी यांचेशी कसलेही वैयक्तीक वैर नसून त्यांचेशी माझा कोणताही पैशांच्या देवाण घेवाणीचा व्यवहार नाही.माझी वरील तक्रार मी सांगितल्या प्रमाणे मराठी मध्ये संगणकावर टंकलिखीत करण्यात आली असून ती मी वाचून बघितली असता बरोबर व खरी टंकलिखीत करण्यात आली आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

RAJKUMAR PANDHARINATH BHUJBAL(SI (Sub-Inspector)) / PCMH93597 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): RAJKUMAR PANDHAI

**Rank**(पद): SI (Sub-Inspector)

**No.**(सं.): PCMH93597

पोलीस स्टेशन ऑफिसर
म्हसवड, पो. ठाणे